# ७५ वर्षाच्या निमित्ताने

दि. १६ जुलै १९४८ रोजी मा. दत्ता जी. साळवी व परळ येथील काही तरुण उत्साही मंडळीनी मील मजदूर सभेच्या कार्यालयात जमून ग्राहक सहकारी मंडळ स्थापन करण्याचे ठरविले व हंगामी समिती नेमली. परळ येथील सरकारी धान्य दुकान न. ८९ चालविण्यास घेण्याचे ठरवून त्याप्रमाणे सरकारकडे रितसर अर्ज करण्यांत आला. तसेच संस्था रजिस्टर करण्यासाठी मा. निबंधक यांच्याकडे अर्ज करण्यांत आला. बऱ्याच अडचणीतून मार्ग काढून आपली संस्था दि. ०६ जानेवारी १९४९ रोजी नोंदणीकृत झाली.

सन १९६३ साली राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात देशात होणारी भाववाढ रोखण्याच्या उद्देशाने ग्राहक सहकारी चळवळीकडे मध्यवर्ती सरकारचे लक्ष गेले  व ग्राहक संस्थाबाबत एक राष्ट्रीय योजना आखण्यात आली. आपल्या संस्थेने केलेल्या प्रगतीकडे पाहून सदरहू योजनेत आपल्याही संस्थेस समाविष्ट करण्यांत आले. दि. २५.०१.१९६३ रोजी आपल्या संस्थेचे मध्यवर्ती संघात रुपांतर करुन त्यांचे औपचारिक उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री श्री. केशवराव सोनावणे यांचे हस्ते करण्यांत आले.

त्यानंतर आपल्या कार्यक्षेत्रातील इतर ग्राहक सोसायट्यांना आपले सभासद करुन घेण्यांत आले. त्यांना आवश्यक तो माल योग्य दरात पुरविणे, वगैरे अनेक कामे, तसेच थोड्या दिवसांत सरकारी धान्य वाटपाचे किचकट व त्रासाचे काम आपल्या संस्थेस मिळाले. त्यातून संस्थेने यशस्वीरित्या वाटचाल केली.

सन १९६२ च्या काळात संस्थेला आयात मालाचा (कस्टम) परवाना मिळाला याची विक्री कापड दुकानात चालू केली. त्याचप्रमाणे राज्य सरकारने खेड्यातून अंडी गोळा करुन ती शहरात विक्रीसाठी योजना आखली होती ती आपण कार्यान्वीत केली. इतर संस्थांना अंडी विक्रीची व्यवस्था केली. आपल्या संस्थेने या योजनेत आस्थापूर्वक काम केले व योजना यशस्वी करुन सरकारला सहाय्य केले. अंड्याच्या योजनेबाबत आपल्या संस्थेने सरकारला जे सहाय्य केले त्याचे प्रतिक म्हणून मुंबई शहरातील सरकारी रुग्णालयांना अंडी पुरवठ्याचे काम सरकारने आपल्या संस्थेकडे सोपविले, त्यानुसार दरारोज सुमारे २,००० अंडी रुग्णालयांना पुरविण्यात येत होती.

यावेळी संघाच्या आठ शाखा होत्या. यापैकी ५ शाखामध्ये नियंत्रित व अनियंत्रित मालाची विक्री करण्यात येत होती. तसेच परळ व्हिलेज व राजभवन येथील दोन शाखा चालू केल्या, त्यावेळी परळ नाका येथील औषधी दुकान सुरु करण्यांत आले.

बालभारती पाठ्यपुस्तक वितरण नियुक्ती संस्थेला बृह्ममुंबई करीता महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाची वितरण एजन्सी दिनांक ०१ एप्रिल १९९७ पासून मिळाली असून संस्थेने सदर काम अतिशय चांगल्या प्रकारे सांभाळले आहे.

जपानमधील ग्राहक सहकारी चळवळ ही जगातील आदर्श व यशस्वी चळवळ आहे. या चळवळीचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील चार प्रतिनिधीची निवड करण्यांत आली. यामध्ये संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. किशोर देसाई यांची निवड या प्रशिक्षणाकरीता करण्यांत आली. जपान येथील प्रशिक्षणाहून परत आल्यावर आपल्या संस्थेत जपानमधील सहकारी चळवळीच्या विविध कल्पना राबविण्याचा श्री. किशोर देसाई हे प्रयत्न करीत होते. तसेच श्री. किशोर देसाई यांनी त्यानंतरच्या काळात संस्थेचे काही संचालक व वरीष्ठ अधिकाऱ्यांना जपान येथे सदरच्या प्रशिक्षणसाठी पाठवले.

संस्थेला ६ जानेवारी १९९९ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली आपल्या संचालक मंडळाच्या अविरत प्रयत्नामुळे संस्था तोट्यातून नफ्यामध्ये आली. हे नमुद करण्यांत अतिशय आनंद होत आहे. संस्थेने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले होते. या निमित्ताने सर्वशाखांचे संगणीकरण करण्याचे आपल्या संस्थेने ठरविले. दि. ०१ एप्रिल १९९९ पासून संस्थेच्या मुख्यकार्यालयात हिशेब संगणकाद्वारे करण्यांत सुरुवात झाली. के. ई. एम.रुग्णालयामध्ये स्वस्त औषधी भांडार गिफ्ट शॉप या नावाने चालविण्यास येणारी औषधी शाखाचे काम संचालक मंडळाने मिळविले होते. त्याचप्रमाणे श्री. गणेश को. ऑप स्टोअर्सचे आपल्या संस्थेत विलीनीकरण करण्यांत आले.

सन १९९८-९९ संस्थेने के.ई.एम हॉस्पिटल औषधी शाखेत बारकोडींगसह संगणीकरण सुरु केले.  ग्राहक

चळवळीत बारकोडींगसह संगणीकरण सुरू करणारी आपली संस्था ही पहिली सहकारी संस्था आहे ही अभिमानास्पद बाब होती.

चाधा बिल्डींग मधील जुन्या जागेचे नुतनीकरण करून त्याठिकाणी भव्य डिपार्टमेंट स्टोअर्सची उभारणी केली. या डिपार्टमेंट स्टोअर्सचे उद्घाटन सद्‌गुरू वामनराव पै यांच्या हस्ते करण्यांत आले. त्यावर्षी सभासदांना १० टक्के लाभांश देण्यांत आला.

सन २००१ मध्ये औषधी भांडार परळ नाका येथील दुकानाचे नुतनीकरण करून अद्यावत करण्यांत आले. याठिकाणी कर न लावता औषधांवर किमान ५ ते ५० टक्के इतक्या सवलतीच्या दराने औषध विक्री सुरू केली. सदर नुतनीकरण झालेल्या शाखेचे उद्घाटन मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. करूण श्रीवास्तव यांच्या हस्ते करण्यांत आले. दसऱ्या निमित्त दि. ७ ऑक्टोंबर २००० रोजी सुपरबाजार तर्फे ग्राहक मेळावा आयोजित करण्यांत आला होता यावेळी प्रमुख पाहुण्या प्रसिध्द अभिनेत्री सौ. अलका कुबल आठल्ये या होत्या. भव्य ग्राहक भेट योजनेची सोडत त्यांच्या हस्ते करण्यांत आली. नॅशनल कन्झुमर्स फेडरेशनचे कार्यकारी संचालक मा. श्री. टि. टि. अधिकारी यांनी भेट दिली व संस्थेने केलेल्या प्रगतीबद्दल प्रशंसा केली. श्रीलंकेचे सहकार प्रतिनिधी यांनी भेट दिली. जपान मियागी को. ऑप व जे. सी. यु. जपानचे अध्यक्ष श्री. थडशी हागा व मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. मिया मोटो श्री. बोकु नकानो यांनी संस्थेस दिनांक ०८ डिसेंबर २००० रोजी भेट दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. किशोर देसाई यांनी जपान येथून प्रशिक्षण घेवून आल्यावर सुपरबाजारची कार्यान्वीत केलेल्या विविध योजनांची प्रशंसा केली.

सन २००१-२००२ या साली संस्थेने कणकवली येथे सुपरबाजार को. ऑप डिपार्टमेंट स्टोअर्स चालू केले. कोकणात प्रवेश केला त्याचे उद्घाटन प्रसिध्द अभिनेत्या सौ. अलका कुबल आठल्ये यांच्या हस्ते झाले.

ग्राहक सहकारी संस्था अतिशय कठीण स्थितीतून जात होत्या. अशा परिस्थितीत संस्थेला सन २००४-२००५ या वर्षात कामकाज करावे लागले. यातच गेली ५ वर्षे सेवाभावी वृत्तीने आपल्या संस्थेने मुंबई महानगरपालिकेच्या के. ई. एम हॉस्पिटलचे औषध दुकान (गीफ्ट शॉप) चालविले. पूर्वी या दुकानाचे व्यवस्थापन केवळ सहकारी ग्राहक संस्थानाच चालविण्यास देण्याचे धोरण होते. तथापि मुळ धोरणात बदल करून मुंबई महापालिकेने हे दुकान खाजगी व्यापाऱ्यास चालविण्यास दिले. त्यामुळे संस्थेची के. ई. एम. हॉस्पिटलची औषध विक्री शाखा बंद झाल्यामुळे संस्थेच्या विक्री व उत्पन्नावर परिणाम झाला. तरीही संस्थेला सगळ्या तरतुदी करून रु. ४,०३,९८२.९० इतका निव्वळ नफा झाला. कणकवली शाखेचा ३ रा वर्धापन दिन साजरा करण्यांत आला. त्यावेळी मराठी अभिनेते श्री. सुधीर जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कामगार विभागाचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे. मुळ सभासद व ग्राहक हे बाहेरगावी राहावयास गेला आहे. त्यामुळे सामान्य माणसाला नजरेसमोर ठेवून व्यवसाय संस्थेने सुरू केले होते ते व्यवसाय आज अडचणीत आले आहेत. तसेच मुक्त आर्थिक धोरणामुळे ग्राहकांच्या शॉपींग बाबतच्या आवडी निवडी बदलत आहेत. भविष्यकाळाचा विचार करून संस्थेने परळ येथील डिपार्टमेंट स्टोअर्सच्या अर्ध्या विभागात विविध नामांकीत कंपन्याच्या रेडिमेड गारमेंटचा फॅक्टरी आऊटलेट सुरू केला. यामुळे संस्थेला निश्चितच उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. पाठ्यपुस्तकाचे पुस्तक वितरणाचे काम व्यवस्थित चालू आहे. कणकवली येथील ग्राहक राजा सुपरभेट योजना राबविण्यात आली. तसेच कणवकली येथे खरेदीवर ग्राहक बोनस चालू करण्यात आला. ग्राहकांना खरेदीच्या दिड टक्का इतका बोनस देण्यांत आला. सुपरभेट योजनेत प्रथम क्रमाकांला मोटर सायकल बजाज बी वाय के हे बक्षीस श्री. सुधीर जोशी यांच्या हस्ते देण्यांत आले.

अनेक वर्षे संघाच्या सेवकांचा पगारवाढ विषयक मागण्या प्रलंबित होत्या. संचालक मंडळाने दिनांक २७ जुलै २००७ रोजी लालबाबटा मजदूर युनियन सोबत पगारवाढ व इतर मागण्यांबाबत करारानामा केला. सन २००८-२००९ या साली सगळीकडे आर्थिक मंदी आल्यामुळे अर्थव्यवस्थेवर फार मोठे संकट ओढवले. याला अपवाद ग्राहक चळवळ नव्हती. गेल्या काही वर्षात खाजगी मॉलचे वारे शहरी भागात पसरले. याचा परिणामही सहकारी ग्राहक संस्थांवर झाला. काही मॉल आर्थिक मंदीमुळे पडले. अशावेळी ग्राहक संस्थेवरही आर्थिक मंदी व स्पर्धा यांचे संकट आले. याला आपली संस्थाही अपवाद नव्हती. संस्थेने पोटनियमात बदल करून संस्थेचे राज्यस्तरीय कार्यक्षेत्र करून घेतले. संस्था शासनाच्या विविध खात्यांना अनेक वस्तूंचा पुरवठा संपूर्ण महाराष्ट्रात करते.

व्यवसायातील स्पर्धेमुळे अनेक औषधी दुकाने बंद होत आहेत. या स्थितीत आपली संस्था एफ. डी.अे च्या नियमाचे काटेकोरपणे पालन करीत आहे. फार्मासीस्टचे वाढलेले पगार विचारात घेता संस्थेच्या नफ्यावर परिणाम होत आहे. संस्थेच्या कणकवली शाखेची विक्री चांगली होत आहे.

सन २००९ मध्ये संस्थने औषधे आणि हेल्थ उत्पादनांच्या किरकोळ विक्री आणि पुरवठा याकरीता आय.एस.ओ. ९००१:२००८ प्रमाणपत्र मिळविण्याकरीता प्रस्ताव सादर केला होता आणि व्यवस्थापनातील गुणवत्तेनुसार संस्थेला आय.एस.ओ. ९००१:२००८ हे गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले असून त्यामुळे संस्थेच्या नाव लौकिकांत खुप मोठी वाढ झाली. त्याचप्रमाणे विविध शासकीय आणि निमशासकीय उपक्रमात अधिकृत पुरवठाधारक म्हणून नोंदणी झाली. त्यामुळे व्यवस्थापनाने निविदा प्रक्रियेतून विविध व्यवसाय या उपक्रमामुळे मिळविले. संस्थेने वेस्टर्न नेव्हल कमांड, सदर्न कमांड (आर्मी) तसेच विविध वस्तूच्या पुरवठ्याकरीता अधिकृत पुरवठाधारक म्हणून नोंदणी केली.

सहकारी चळवळ दिवसेंदिवस अधिक कमजोर होत आहे. मुक्त आर्थिक व्यवस्थेत रिटेलिंगच्या व्यवसायात दिवसेंदिवस वाढत चालेल्या स्पर्धेला ग्राहक संस्थाना तोंड द्यावे लागत आहे. मुंबईत मोजक्याच ग्राहक संस्था पाय रोवून काम करतांना दिसतात त्यामध्ये आपली एक संस्था आहे.

रेशनिंग विभाग, फॅक्टरी आउटलेट या तयार कपड्याच्या दालनाचीपण विक्री चांगली होत आहे. संस्थेने परळ व लालबाग या दोन्ही औषधी शाखेवर जनेरिक औषधे गोरगरीब रुग्णांकरीता उपलब्ध केली असून सदर औषधांवर १२ ते ८० टक्के सुट देण्यांत येते. त्याचा फायदा ग्राहकांना होत आहे. कणकवली येथील सुपरबाजार शाखेत ग्राहकांना जीवनावश्यक वस्तूंवर २ ते २५ टक्के सुट देण्यांत येते.

सन २०१६-२०१७ मध्ये संस्थेने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांच्या महाराष्ट्रातील सर्व रुग्णालयांना अन्नधान्य व भाजीफळे पुरवठ्याचे काम ई निविदाद्वारे मिळविले होते. सदर काम संस्थेने अतिशय संक्षमपणे सांभाळले. परळ, परळ व्हिलेज येथील ई. शाखा तसेच दादर, प्रभादेवी या भागातील ३ मोबाईल, रेशनिंग शाखांच्या मार्फत सरकारी योजनेनुसार कार्डधारकांना रेशन विक्री चालू आहे.

निविदा प्रक्रियेतून सन २०१९-२० मध्ये पंतप्रधान जनऔषधी योजना अंतर्गत रुग्णालयात औषधी दुकाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे अखत्यारितील रुग्णालयात औषधी दुकाने चालविण्याचे काम संस्थेस मिळाले. सदर दुकाने ऑक्टोंबर, नोव्हेंबर २०१९ रोजी सुरु झाली. सन २०२०-२१ संस्थेच्या ७३ वा वार्षिक अहवाल सालात कोव्हीड १९ चे संकट संपूर्ण जगात होते त्यामुळे संस्थेच्या नियमित व्यवसायावर खुप मोठा परिणाम झाला होता, तरी संस्थेने रुग्णालय औषधी पुरवठा आणि विक्री यामध्ये वाढ केली. सन २०२१-२०२२ हे देशाच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. आम्हांला अभिमान आहे आम्ही देखील देशाच्या स्वातंत्र्यांच्या ७५ व्या वर्षा बरोबर संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात पर्दापण केले आहे.

बालभारती पाठ्यपुस्तक विभाग यांचे पुढील ५ वर्षाकरीता काम मिळाले आहे. नाईकी कंपनीचे फॅक्टरी आऊटलेट दालनाची विक्री चांगली आहे. संस्था गेली २० वर्षे सभासदांना १२ टक्के लाभांश देत आहे. यावर्षी सभासदांना अमृत महोत्सवी वर्ष म्हणून १५ टक्के लाभांश देण्यांत आला. तसेच संस्थेने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संघाच्या सेवकांना २० टक्के बोनस देण्यांत आला. संस्थेला मागील २० वर्षे वैधानिक लेखापरिणाम मध्ये “अ” ऑडीट वर्ग मिळत आहे.

संस्थेने वेस्टर्न नेव्ही आर्मी व वेस्टर्न रेल्वे सारख्या प्रतिष्ठीत शासकीय विभागात अधिकृत पूरवठा धारक म्हणून नोंदणी केली असल्याने त्यातूनही संस्थेस व्यवसायिक संधी उपलब्ध होत आहेत. संस्थेच्या पंच्याहत्तरीच्या वाटचालीमध्ये संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, संचालक, कर्मचारी, ग्राहक व सभासद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्था हे कधीही विसरु शकणार नाही.

**आपले नम्र,**

| | | |
|---|---|---|
| **किशोर बाबुराव देसाई** | **रविंद्र यशवंत पांचाळ** | **राजेंद्र बळवंत कुलकर्णी** |
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सरव्यवस्थापक** |